भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-17/42
एफआयडीडी.जीएसएसडी.सीओ.बीसी.क्र.13/09.01.03/2016-17 ऑगस्ट 25, 2016

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक,
सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बँका.

महोदय/महोदया,

**दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (डीएवाय - एनआरएलएम) - आजीवन - व्याज द्रव्यसहाय्य योजना**

कृपया, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (एनआरएलएम) खालील व्याज द्रव्यसहाय्य योजनेवरील आमचे परिपत्रक एफआयडीडी.जीएसएसडी.सीओ.बीसी.क्र.19/09.01.03/2015-16 दि. जानेवारी 21, 2016 चा संदर्भ घ्यावा.

(2) भारत सरकारच्या, ग्रामीण विकास मंत्रालयाकडून मिळालेल्या, डीएवाय-एनआरएलएम खालील, व्याज द्रव्यसहाय्य योजनेवरील, 2016-17 सालासाठीची सुधारित मार्गदर्शक तत्वे, सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँका व खाजगी क्षेत्रातील 15 बँकांद्वारा (सोबत जोडलेल्या यादीनुसार) अंमलबजावणीसाठी ह्या सोबत जोडण्यात आली आहेत.

आपली विश्वासु,

(उमा शंकर)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत : वरीलप्रमाणे

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, 10वा मजला, केंद्रीय कार्यालय भवन, शहिद भगत सिंह मार्ग, पो.बा.सं.10014, मुंबई 400 001 टेलिफोन: 022-22601000 फॅक्स: 91-22-22621011/22619048 ईमेल: cgmincfidd@rbi.org.in

**सावधानतेचा इशारा :** बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.

## महिला एसएचसीसाठी व्याज द्रव्यसहाय्य योजना - वर्ष 2016-17

**(1) 250 जिल्ह्यांमधील, सर्व वाणिज्य बॅंका (केवळ सार्वजनिक क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील व प्रादेशिक ग्रामीण बॅंका) व सहकारी बॅंका ह्यांच्यासाठी, 2016-17 सालामध्ये, महिला एसएचजींना द्यावयाच्या कर्जावरील व्याज अर्थसहाय्य योजना**

(1) रु. 3 लाख पर्यंतच्या कर्जावर दरसाल 7% दराने व्याज अर्थसहाय्यासाठी सर्व महिला एसएचजी पात्र असतील. विद्यमान येणे असलेल्या कर्जामध्ये, एसजीएसवाय खाली भांडवली अर्थसहाय्य (सबसिडी) मिळत असलेले महिला एसएचजी, ह्या योजनेखालील लाभ मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

(2) 250 जिल्ह्यांमधील ग्रामीण भागातील सर्व महिला एसएचजींना 7% दराने कर्ज देणा-या वाणिज्य व सहकारी बॅंकांची यादी जोडपत्र 1 मध्ये दिली आहे.

(3) 2016-17 सालासाठी, सर्व वाणिज्य बॅंकांना, 5.5% एव्हढी कमाल मर्यादा ठेवून, आकारलेले सरासरी भारित व्याज (वित्तमंत्रालयाच्या वित्तसेवांनी, 2016-17 सालासाठी विहित केलेले डब्ल्युएआयसी - जोडपत्र 2) आणि 7% ह्यामधील फरकाच्या रकमेचे द्रव्य सहाय्य केले जाईल. मात्र हे द्रव्य सहाय्य, बॅंकांनी, 250 जिल्ह्यांमध्ये एसएचजींना दरसाल 7% दराने कर्जे दिली असण्याच्या अटींवरच सर्व बॅंकांना दिले जाईल.

(4) ह्याशिवाय, त्या एसएचजींनी त्वरित कर्जफेड केल्यास त्यांना 3% अतिरिक्त द्रव्यसहाय्य दिले जाईल. त्वरित कर्जफेड केल्यामुळे अतिरिक्त 3% व्याज द्रव्यसहाय्याबाबत, भारतीय रिझर्व बॅंकेने (आरबीआय) विहित केलेला पुढील निकष पूर्ण केला असल्यासच ते एसएचजी खाते त्वरित अदाकर्ता म्हणून समजले जाईल.

<u>(अ) कॅश क्रेडिट लिमिटसाठी</u>

(1) आऊटस्टॅंडिंग बॅलन्स हा, विहित केलेली मर्यादा/निकासीच्या रकमेपेक्षा सातत्याने 30 दिवसांपेक्षा अधिक काळ असू नये.

(2) त्या खात्यात नियमितपणे पैसे भरले व काढले जात असावेत. कोणत्याही परिस्थितीत, **महिन्यामधून किमान एकदातरी ग्राहकाने पैसे जमा केले असावेत**.

(3) **ग्राहकाद्वारे जमा केलेली रक्कम**, त्या महिन्यातील व्याज डेबिट करण्यास पुरेशी असावी.

(ब) <u>मुदत कर्जांसाठी</u> - कर्जाच्या मुदतीदरम्यान, व्याजाचे सर्व प्रदान/मुद्दलाचे सर्व हप्ते, ड्यु म्हणजे ठरविलेल्या/देय तारखेपासून 30 दिवसांच्या आत भरले गेले आहेत असे मुदत कर्ज खाते; त्वरित प्रदान खाते म्हणून समजले जावे.

भविष्य काळातही, त्वरित प्रदानासाठीची मार्गदर्शक तत्वे ही आरबीआयने त्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार असणे सुरुच राहील.

अहवाल पाठविण्याच्या तिमाहीच्या अखेरीस असलेली त्वरित प्रदान एसएचजी खाती, 3% अतिरिक्त व्याज-द्रव्य सहाय्यासाठी पात्र असतील. बँकांनी हे 3% चे व्याज द्रव्यसहाय्य त्यासाठी पात्र असलेल्या एसएचजी कर्ज खात्यात जमा करावे व त्यानंतर त्याची भरपाई/परतावा मागावा.

(5) ही योजना केवळ ग्रामीण भागातील महिला एसएचसींसाठीच मर्यादित आहे.

(6) ह्या योजनेसाठीचा निधी, डीएवाय-एनआरएलएम खाली केंद्रीय वाट्यामधून उपलब्ध केला जाईल.

(7) ह्या व्याजद्रव्य सहाय्य योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक क्षेत्रातील बँका व खाजगी क्षेत्रातील बँकांसाठी, ग्रामीण विकास मंत्रालयाने (एमओआरडी) निवडलेल्या एका नोडल बँकेच्या मार्फत केली जाईल. एमओआरडीने सांगितल्याप्रमाणे, ही नोडल बँक, एका वेब आधारित मंचाद्वारे ही योजना कार्यान्वित करील. 2016-17 सालासाठी, एमओआयडीने, कॅनरा बँकेला नोडल बँक म्हणून नेमले आहे.

(8) कोअर बँकिंग सोल्युशन्स (सीबीएस) राबविणा-या सर्व बँका ह्या योजनेखालील व्याजद्रव्य सहाय्य मिळवू शकतात.

(9) 7% ह्या नियमित द्रव्य सहाय्य दराने, एसएचजींना दिलेल्या कर्जावरील व्याज द्रव्यसहाय्य मिळविण्यासाठी, सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांनी, एसएचजीच्या कर्ज खात्याची माहिती, नोडल बँकेच्या पोर्टलवर आवश्यक त्या तांत्रिक निकषांसह अपलोड करणे आवश्यक आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनीही, 3% अतिरिक्त व्याज-द्रव्यसहाय्याबाबतचे दावे त्याच पोर्टलवर टाकावेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी त्यांचे नियमित दावे (डब्ल्युएआयसी किंवा कर्जदर व 7% ह्यामधील फरक अशी त्वरित प्रदानावरील अतिरिक्त 3%) तिमाही धर्तीवर, जून 30, 2016, सप्टेंबर 30, 2016, डिसेंबर 31, 2016 व मार्च 31, 2017 रोजी असल्यानुसार पुढील महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापर्यंत सादर करावेत.

(10) एसएचजींना दिलेल्या कर्जावरील 7% व्याज द्रव्यसहाय्य व 3% एवढे अतिरिक्त द्रव्यसहाय्याचे दावे मिळविण्यासाठी, सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि खाजगी क्षेत्रातील बँकांनी, नोडल बँकेकडे, तिमाही धर्तीवर दाव्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही बँकेने सादर केलेल्या दाव्यांसोबत, द्रव्यसहाय्य खरे व योग्य असल्याचे प्रमाणपत्र (मूळ प्रत) सादर केले जावे (जोडपत्र 3 ते 5), मार्च 2017 अखेरीसच्या तिमाहीच्या द्राव्यांची तडजोड,

त्या बँकेने 2016-17 ह्या संपूर्ण वर्षासाठी, स्टॅट्युटरी ऑडिटरने दिलेले प्रमाणपत्र मिळाल्यावर, एमओआरडीकडून केली जाईल.

(11) 2016-17 सालामध्ये केलेला परंतु त्या वर्षात समाविष्ट न केलेला एखादा दावा. सार्वजनिक क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील बँकांनी, तो दावा खरा असल्याबाबतचे, स्टॅट्युटरी ऑडिटरचे प्रमाणपत्र जोडून, 'अतिरिक्त दावा' असे लिहून, उशिरात उशिरा जून 30, 2017 पर्यंत वेगळ्याने सादर केला जावा.

(12) बँकांनी त्यांच्या दाव्यांमधील दुरुस्त्या, ऑडिटरच्या प्रमाणपत्रावर आधारित त्यानंतरच्या दाव्यांमध्ये समायोजित केल्या जातील. सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील बँकांसाठी ह्या दुरुस्त्या नोडल बँकेच्या पोर्टलवरच असाव्यात.

## II. वर्ग 2 जिल्हयांसाठी (250 जिल्हे सोडून) व्याज द्रव्यसहाय्य योजना

वरील 250 जिल्हे सोडून, वर्ग 2 जिल्हयांसाठी, डीएवाय-एनआरएलएम खालील सर्व महिला एसएचजी गट, 7% व्याजदराने कर्ज सुविधा मिळविण्यास, व्याज द्रव्यसहाय्य मिळविण्यास पात्र असतील. ह्या द्रव्य सहाय्यासाठीचा निधी, डीएवाय-एनआरएलएम साठी ठेवलेल्या रकमेतून राज्य ग्रामीण उपजीविका अभियान (एसआरएलएम) कडे उपलब्ध केला जाईल. वर्ग 2 जिल्हयांमध्ये, बँका त्यांच्या कर्ज देण्याच्या निकषांनुसार एसएचजींवर आकार लावतील, आणि कर्ज देण्याचा दर व 7% ह्यामधील आ.व. 2016-17 साठी असलेला फरक (कमाल मर्यादा 5.5%), एसआरएलएमद्वारा, त्या एसएचजींच्या कर्ज खात्यांमध्ये द्रव्यसहाय्य करुन भरुन काढला जाईल. ह्याला अनुसरुन, 2016-17 सालासाठी, वर्ग 2 जिल्हयांसाठी व्याज-द्रव्यसहाय्याच्या मार्गदर्शक तत्वांची मुख्य लक्षणे पुढीलप्रमाणे असतील :-

### (अ) बँकांची भूमिका

कोअर बँकिंग सिस्टिम (सीबीएस) कार्यरत करणा-या बँकांनी, सर्व जिल्हयांमधील एसएचजींना दिलेल्या व देणे शिल्लक असलेल्या कर्जांची माहिती, एमओआरडीने सुचविलेल्या नमुन्यामध्ये, थेट सीबीएस मंचावरुन, ग्रामीण विकास मंत्रालयाला (एफटीपी मार्फत) व एसआरएलएमना कळविणे आवश्यक आहे. एसएचजींना वाटप करावयाच्या व्याज द्रव्यसहाय्याचे गणन व वाटप करण्यास मदत होण्यासाठी ही माहिती मासिक धर्तीवर दिली जावी.

**<u>(ब) राज्य सरकारांची भूमिका</u>**

डीएवाय - एनआरएलएम खाली सर्व महिला एसएचजी, एसएचजी म्हणूनच समजल्या जातात आणि त्वरित परतफेड केल्यास, रु. 3 लाख पर्यंतच्या कर्जासाठी 7% दराने, त्या व्याजद्रव्यसहाय्यास पात्र आहेत.

(2) ह्या योजनेची अंमलबजावणी राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांच्या (एसआरएलएम) द्वारा केली जाईल. वाणिज्य व सहकारी बँकांकडून कर्ज मिळविलेल्या व पात्र असलेल्या एसएचजींना, एसआरएलएम व्याज द्रव्यसहाय्य उपलब्ध करुन देईल. ह्या द्रव्यसहाय्यासाठीचा निधी, भारत सरकारच्या निकषांनुसार, केंद्रीय वाटप व राज्य सरकारची वर्गणी ह्यामधून भागविला जाईल.

(3) 2016-17 सालासाठी बँकांचा कर्ज देण्याचा दर व 7% ह्यामधील फरक (कमाल मर्यादा 5.5%), थेट मासिक/तिमाही धर्तीवर एसआरएलएमद्वारा एसएचजींना दिला जाईल. ज्यांनी त्वरित परतफेड केली आहे अशा एसएचजींच्या कर्ज खात्यांमध्ये, एसआरएलएम द्वारे, द्रव्यसहाय्याची रक्कम ई-ट्रान्स्फरमार्फत जमा केली जाईल.

(4) व्याजद्रव्यसहाय्य करण्यासाठी, आरबीआयने विहित केलेले पुढील निकष पूर्ण केलेले असल्यास ते खाते त्वरित प्रदानकर्ता म्हणून समजले जाईल :

<u>(अ) कॅश क्रेडिट मर्यादेसाठी</u>

(1) आऊटस्टँडिंग शिल्लक सतत तीस दिवसांपेक्षा अधिक काळासाठी लिमिट/निकासी मर्यादेपेक्षा जास्त नसावी.

(2) त्या खात्यात नियमितपणे जमा व निकासी होत रहावी. कोणत्याही परिस्थितीत, महिन्यातून एकदातरी ग्राहकाने पैसे जमा करावेत.

(3) ग्राहकाने जमा केलेली रक्कम त्या महिन्यात वजा केलेल्या व्याजासाठी पुरेशी असावी.

(ब) <u>मुदत कर्जांसाठी</u> : त्या कर्जाच्या मुदतीमध्ये, व्याजाचे सर्व हप्ते/मुद्दलाचे हप्ते देय तारखेपासून 30 दिवसांच्या आत अदा केले गेले आहेत अशा मुदत कर्ज खात्याला त्वरित प्रदान खाते समजले जाईल. भविष्यकाळातही, ह्या विषयावर आरबीआयने दिलेल्या त्वरित प्रदानाबाबतची मार्गदर्शक तत्वे लागु असणे सुरुच राहील.

(5) विद्यमान कर्जांमध्ये एसजीएसवाय खाली भांडवली अर्थसहाय्य मिळविलेल्या महिला एसएचजी, ह्या योजनेखाली, घेतलेल्या कर्जासाठी व्याज द्रव्यसहाय्याचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

(6) एसआरएलएमनी, पात्र असलेल्या एसएचजींच्या कर्ज खात्यात हस्तांतरित केलेल्या द्रव्यसहाय्याच्या रकमा दर्शविणारे, तिमाही उपयोजिता प्रमाणपत्र सादर करावे.

**III.** राज्य-विशिष्ट अशा व्याज द्रव्यसहाय्य योजना राबविणा-या राज्यांनी त्यांच्या मार्गदर्शक तत्वांचा समन्वय केंद्रीय योजनेशी करण्यास सांगण्यात येत आहे.

**जोडपत्र 1**

## कर्जावरील 7% व्याजद्रव्यसहाय्य व त्वरित प्रदानासाठी अतिरिक्त 3% व्याजद्रव्यसहाय्यासाठी पात्र असलेल्या 250 जिल्ह्यांची यादी

| अनुक्रमांक | राज्ये | अनुक्रमांक | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 1 | गुंटूर |
| | | 2 | कृष्णा |
| | | 3 | श्रीकाकुलम |
| | | 4 | पूर्व गोदावरी |
| | | 5 | विजयनगर |
| | | 6 | विशाखापट्टणम |
| 2 | अरुणाचल प्रदेश | 1 | पूर्व सियांग |
| | | 2 | पूर्व कामेंग |
| | | 3 | पापूमपरे |
| | | 4 | लोहित |
| 3 | आसाम | 1 | चिरांग |
| | | 2 | कार्बी आंगलॉग |
| | | 3 | सोनितपूर |
| | | 4 | तिनसुकिया |
| | | 5 | हैलकंडी |
| | | 6 | धेमेजी |
| | | 7 | जोरहाट |
| | | 8 | नागा |
| 4 | बिहार | 1 | साहरसा |
| | | 2 | सुपौल |
| | | 3 | मधेपुरा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | नालंदा |
| | | 5 | खाग्रीया |
| | | 6 | पूर्व चंपारण(मोतिहारी) |
| | | 7 | अर्वाल |
| | | 8 | औरंगाबाद |
| | | 9 | गया |
| | | 10 | जमुई |
| | | 11 | जेहानाबाद |
| | | 12 | कैमूर |
| | | 13 | मुंगेर |
| | | 14 | नवादा |
| | | 15 | रोहतास |
| | | 16 | पश्चिम चंपारण |
| | | 17 | सितामढी |
| 5 | छत्तीसगड | 1 | बलरामपूर |
| | | 2 | सुराजपूर |
| | | 3 | सुकमा |
| | | 4 | कोंडागांव |
| | | 5 | गरियाबंद |
| | | 6 | बालोडा बाजार |
| | | 7 | धामतारी |
| | | 8 | रायगड |
| | | 9 | बस्तर |
| | | 10 | बिजापूर |
| | | 11 | दंतेवाडा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 12 | जाशपूर |
| | | 13 | कंकेर |
| | | 14 | कावर्धा |
| | | 15 | कोरिया |
| | | 16 | नारायणपूर |
| | | 17 | राजनांदगाव |
| | | 18 | सार्गुजा |
| 6 | गुजरात | 1 | छोटा उदेपूर |
| | | 2 | महिसागर |
| | | 3 | मेहसाणा |
| | | 4 | जुनागड |
| | | 5 | वडोदरा |
| | | 6 | बनासकांठा |
| | | 7 | पंचमहल |
| 7 | झारखंड | 1 | पाकूर |
| | | 2 | दुमका |
| | | 3 | गोधा |
| | | 4 | बोकारो |
| | | 5 | छत्रा |
| | | 6 | गाह्वा |
| | | 7 | गिरीध |
| | | 8 | गुमला |
| | | 9 | हाजारीबाग |
| | | 10 | खुंटी |
| | | 11 | कोडार्मा |
| | | 12 | लातेहर (उ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 13 | लोहारडागा |
| | | 14 | पश्चिम सिंगभूम |
| | | 15 | पलामू |
| | | 16 | पूर्वी सिंगभूम |
| | | 17 | रामगढ |
| | | 18 | रांची (ग्रामीण) |
| | | 19 | सराईकेला (उ) |
| | | 20 | सिमदेगा (उ) |
| 8 | कर्नाटक | 1 | बिजापुर |
| | | 2 | चामराजनगर |
| | | 3 | चित्रदुर्ग |
| | | 4 | गुलबर्गा |
| | | 5 | म्हैसुर |
| | | 6 | तुमकूर |
| | | 7 | गदग |
| | | 8 | कोप्पल |
| 9 | मध्य प्रदेश | 1 | सागर |
| | | 2 | दमोह |
| | | 3 | टिकमगढ |
| | | 4 | पन्ना |
| | | 5 | चाहतापुर |
| | | 6 | झाबुआ |
| | | 7 | धार |
| | | 8 | अन्नुपुर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 9 | बालाघाट |
| | | 10 | दिंडोरी |
| | | 11 | मंडला |
| | | 12 | शिवनी |
| | | 13 | शाहडोल |
| | | 14 | सिढी |
| | | 15 | उमरिया |
| | | 16 | छिंदवाडा |
| | | 17 | सिंग्रौली |
| | | 18 | बडवानी |
| | | 19 | शिवपुर |
| | | 20 | अलिराजपुर |
| | | | |
| 10 | महाराष्ट्र | 1 | सोलापुर |
| | | 2 | रत्नागिरी |
| | | 3 | ठाणे |
| | | 4 | वर्धा |
| | | 5 | बीड |
| | | 6 | सिंधुदुर्ग |
| | | 7 | चंद्रपूर |
| | | 8 | गडचिरोली |
| | | 9 | गोंदिया |
| | | 10 | जालना |
| | | 11 | उस्मानाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 12 | नंदुरबार |
| | | 13 | यवतमाळ |
| 11 | **ओडिशा** | 1 | अंगुल |
| | | 2 | भद्रक |
| | | 3 | बालासोर |
| | | 4 | कटक |
| | | 5 | बालनगीर |
| | | 6 | देवगढ |
| | | 7 | गजपती |
| | | 8 | गंजम |
| | | 9 | जयपूर |
| | | 10 | कालाहंडी |
| | | 11 | कंधमाल |
| | | 12 | केंदुजहार |
| | | 13 | कोरापूत |
| | | 14 | मलकनगिरी |
| | | 15 | मयूरभंज |
| | | 16 | नवरंगपुर |
| | | 17 | नयागढ |
| | | 18 | नौपाडा |
| | | 19 | रायगडा |
| | | 20 | संबलपूर |
| | | 21 | सोनापुर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 22 | सुंदरगढ |
| 12 | **राजस्थान** | 1 | डुंगरपुर |
| | | 2 | बांसवडा |
| | | 3 | धोलपूर |
| | | 4 | झालावर |
| | | 5 | बरान |
| | | 6 | अजमेर |
| | | 7 | अलवार |
| | | 8 | दाऊसा |
| | | 9 | उदयपूर |
| 13 | **तामिळनाडू** | 1 | कुड्डालोर |
| | | 2 | नागपट्टीनम |
| | | 3 | तंजावर |
| | | 4 | त्रिची |
| | | 5 | दिंडुगल |
| | | 6 | विलुपुरम |
| | | 7 | वेल्लोर |
| | | 8 | तिरुवन्नमलाई |
| | | 9 | धर्मपुरी |
| 14 | उत्तर प्रदेश | 1 | आग्रा |
| | | 2 | अलीगढ |
| | | 3 | औराईया |
| | | 4 | बस्ती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 5 | बिजनौर |
| | | 6 | लखीमपूर खेरी |
| | | 7 | उन्नाव |
| | | 8 | वाराणसी |
| | | 9 | बाराबंकी |
| | | 10 | गोरखपुर |
| | | 11 | लखनौ |
| | | 12 | चंदौली |
| | | 13 | मिर्झापूर |
| | | 14 | सोनभद्र |
| | | 15 | बदायुन |
| | | 16 | हरदोई |
| | | 17 | इटावा |
| | | 18 | आझमगढ |
| | | 19 | अलाहाबाद |
| | | 20 | आंबेडकर नगर |
| | | 21 | बहराईच |
| | | 22 | देवरिया |
| | | 23 | जलाऊं |
| | | 24 | हमीरपुर |
| | | 25 | बांदा |
| 15 | पश्चिम बंगाल | 1 | अलिपुरद्वार |
| | | 2 | पूर्व मेदिनीपुर |
| | | 3 | दक्षिण चोवीस परगणा |
| | | 4 | बांकुरा |
| | | 5 | मेदिनीपुर पश्चिम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 6 | कूच बिहार |
| | | 7 | बीरभूम |
| | | 8 | पुरुलिया |
| 16 | तेलंगणा | 1 | मेहबूबनगर |
| | | 2 | आदिलाबाद |
| | | 3 | वारंगल |
| | | 4 | खम्मम |
| | | 5 | करीमनगर |
| 17 | केरळ | 1 | इडुक्की |
| | | 2 | वायनाडु |
| | | 3 | पल्लकड |
| | | 4 | मलप्पुरम |
| 18 | हरियाणा | 1 | महेंद्रगढ |
| | | 2 | कर्नाल |
| | | 3 | जिंद |
| | | 4 | मेवात |
| | | 5 | भिवानी |
| | | 6 | झाज्जर |
| 19 | हिमाचल प्रदेश | 1 | कांगडा |
| | | 2 | उना |
| | | 3 | शिमला |
| | | 4 | मंडी |
| 20 | जम्मू-काश्मीर | 1 | कुपवाडा |
| | | 2 | पूंछ |
| | | 3 | किस्तवार |
| | | 4 | गंदेरबल |
| | | 5 | बडगाम |
| | | 6 | उधमपूर |
| 21 | पंजाब | 1 | पटियाला |
| | | 2 | संगरुर |
| | | 3 | भटिंडा |
| | | 4 | तरन-तारन |
| | | 5 | गुरुदासपूर |
| | | 6 | फिरोजपुर |
| 22 | उत्तराखंड | 1 | पिठुरगढ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 2 | पोहरी गढवाल |
| | | 3 | चमोली |
| | | 4 | बागेश्वर |
| 23 | मणिपूर | 1 | चंडेल |
| | | 2 | इम्फाल पूर्व |
| 24 | मेघालय | 1 | वेस्ट गारो हिल्स |
| | | 2 | दक्षिण पश्चिम खासी हिल्स |
| | | 3 | पश्चिम खासी हिल्स |
| 25 | मिझोराम | 1 | सरछिप |
| | | 2 | अैजवाल |
| | | 3 | लुंगलेई |
| 26 | नागालँड | 1 | किफेरे |
| | | 2 | लोंगलेंग |
| | | 3 | पेरेन |
| | | 4 | त्युएनसंग |
| | | 5 | मोन |
| 27 | त्रिपुरा | 1 | ढलाई |
| | | 2 | पश्चिम त्रिपुरा |
| | | 3 | उत्तर त्रिपुरा |
| 28 | पुदुच्चेरी | 1 | पुडुचेरी |
| 29 | अंदमान आणि निकोबार द्वीप | 1 | उत्तर आणि मध्य अंदमान जिल्हा |
| 30 | सिक्कीम | 1 | दक्षिण सिक्कीम |
| | | 2 | पूर्व सिक्कीम |
| 31 | गोवा | 1 | उत्तर गोवा |

जोडपत्र - 2

**खाजगी बँकांचा, 2016-17 सालासाठीचा भारित सरासरी व्याजदर ________________________**

| 2016-17 सालासाठी पीएसबींना लागु असलेला डब्ल्युएआयसी | | | |
|---|---|---|---|
| अनुक्रमांक | बँकेचे नाव | आकारलेले भारित सरासरी व्याज (डब्ल्युएआयसी) | 5.5% च्या मर्यादेमध्ये डब्ल्युएआयसीवर 7% पेक्षा जास्त द्रव्यसहाय्य करावयाचे व्याज. |
| 1 | अलाहाबाद बँक | 10,52 | 3.52 |
| 2 | आंध्र बँक | 12.5 | 5.50 |
| 3 | बँक ऑफ बडोदा | 9.65 | 2.65 |
| 4 | बँक ऑफ इंडिया | 13.27 | 5.50 |
| 5 | बँक ऑफ महाराष्ट्र | 11.2 | 4.20 |
| 6 | कॅनरा बँक | 11.15 | 4.15 |
| 7 | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | 10.5 | 3.50 |
| 8 | कॉर्पोरेशन बँक | 11.65 | 4.65 |
| 9 | देना बँक | 11.09 | 4.09 |
| 10 | इंडियन बँक | 11.95 | 4.95 |
| 11 | इंडियन ओव्हरसीज बँक | 10.81 | 3.81 |
| 12 | ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स | 11.45 | 4.45 |
| 13 | पंजाब नॅशनल बँक | 11.5 | 4.50 |
| 14 | पंजाब आणि सिंध बँक | 11.62 | 4.62 |
| 15 | स्टेट बँक ऑफ बिकानेर आणि जयपूर | 12.73 | 5.50 |
| 16 | स्टेट बँक ऑफ हैदराबाद | 12.05 | 5.05 |
| 17 | स्टेट बँक ऑफ इंडिया | 12.25 | 5.25 |
| 18 | स्टेट बँक ऑफ म्हैसूर | 10.6 | 3.60 |
| 19 | स्टेट बँक ऑफ पतियाळा | 10.78 | 3.78 |
| 20 | स्टेट बँक ऑफ त्रावणकोर | 11.49 | 4.49 |
| 21 | सिंडिकेट बँक | 11.15 | 4.15 |
| 22 | युको बँक | 10.7 | 3.700 |
| 23 | युनियन बँक | 10 | 3.00 |
| 24 | युनायटेड बँक ऑफ इंडिया | 11.47 | 4.47 |
| 25 | विजया बँक | 13.93 | 5.50 |
| 26 | आयडीबीआय | 11.5 | 4.50 |
| 27 | भारतीय महिला बँक | 11.7 | 4.70 |

| अनुक्रमांक | बँकेचे नाव | आकारलेले भारित सरासरी व्याज (डब्ल्युएआयसी) | 5.5% च्या मर्यादेमध्ये डब्ल्युएआयसीवर 7% पेक्षा जास्त द्रव्यसहाय्य करावयाचे व्याज. |
|---|---|---|---|
| 1 | करूर वैश्य बँक | 10.67 | 3.67 |
| 2 | कोटक महिंद्रा | NA* | NA* |
| 3 | धन लक्ष्मी | 12.50 | 5.50 |
| 4 | तामिळनाडू मर्कंटाईल बँक | 12.65 | 5.50 |
| 5 | येस बँक | NA | NA |
| 6 | इंडसइंड बँक | NA | NA |
| 7 | ॲक्सिस बँक | 12.48 | 5.48 |
| 8 | एचडीएफसी | 15.25 | 5.50 |
| 9 | आयसीआयसीआय बँक | 14.35 | 5.50 |
| 10 | लक्ष्मी विलास बँक | 12.45 | 5.45 |
| 11 | जम्मू आणि काश्मीर | 12.50 | 5.50 |
| 12 | सिटी युनियन बँक | 11.07 | 4.07 |
| 13 | कर्नाटक बँक लिमिटेड | 11.50 | 4.50 |
| 14 | डीसीबी बँक | 26.00 | 5.50 |
| 15 | आरबीएल बँक | 18.00 | 5.50 |

जोडपत्र 3

**2016-17 सालासाठी, महिला एसएचजींना, दरसाल 7% व्याजदरात, रु.3 लाखापर्यंत दिलेल्या कर्जावरील व्याज-द्रव्यसहाय्यासाठीचा दावा**

**बँकेचे नाव :**

**____________________ पासून ___________________पर्यंत, रु.3 लाखापर्यंत वाटप केलेल्या/आऊटस्टँडिंग असलेल्या कर्जाबाबतचे दावे.**

<table>
<tr><th colspan="2">____पासून ____ पर्यंतच्या कालावधीत उघडलेली नवी खाती</th><th colspan="2">____ रोजी(मागील कालावधीची अखेर) असलेले आऊटस्टँडिंग</th><th colspan="2">____रोजी असलेले एकूण आऊटस्टँडिंग</th><th>व्याज द्रव्यसहाय्याची रक्कम</th></tr>
<tr><th>खात्यांची संख्या</th><th>रक्कम</th><th>खात्यांची संख्या</th><th>रक्कम</th><th>खात्यांची संख्या</th><th>रक्कम</th><th>रक्कम</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

आम्ही येथे प्रमाणित करतो की 2016-17 सालामध्ये, महिला एसएचजींना रु.3 लाखाच्या, दिलेल्या/आऊटस्टँडिंग असलेल्या कर्जावर दरसाल 7% व्याज आकारण्यात आले आहे. आम्ही असेही प्रमाणित करतो की, वरीलप्रमाणे दावा केलेल्या रक्कमा व खाती केवळ वर्ग-1 जिल्ह्यांमधील असून, ती आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार व्याज-द्रव्यसहाय्यासाठी पात्र आहेत. आम्ही असेही प्रमाणित करतो की, ह्या दाव्यांची द्विरुक्ती केली गेलेली नाही, आणि शाखा स्तरानंतरही, नियमित दावा किंवा अतिरिक्त व्याज-द्रव्यसहाय्य दावा सादर करण्यात किमान मानवी हस्तक्षेप झालेला आहे.

तारीख :

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

(ह्या वर्षासाठी एकत्रीकृत केलेला हा दाव्यांचा नमुना, स्टॅट्युटरी ऑडिटर्सद्वारा प्रमाणित केला जाऊन, मार्च 31 रोजी संपणा-या तिमाहीसाठींच्या दाव्यांसह, पुढील आर्थिक वर्षाच्या 30 जून पर्यंत सादर केला जाणे आवश्यक आहे)

**जोडपत्र 4**

**2016-17 सालासाठी, रु.3 लाखांपर्यंतच्या कर्जासाठी, त्वरित प्रदान केले असल्यास 3% दराने अतिरिक्त व्याज द्रव्यसहाय्यासाठीचा दावा**

**बँकेचे नाव :**

**____________________ते ____________________ पर्यंतच्या काळासाठी रु.3 लाखांपर्यंतच्या वाटपाच्या/आऊटस्टँडिंग असलेल्या कर्जांबाबतच्या दाव्यांचे विवरणपत्र.**

| ____ ते ____ पर्यंत उघडलेली नवीन कर्ज खाती | | ____ रोजी (मागील कालावधीची अखेर) आऊटस्टँडिंग | | ____ रोजी असलेले एकूण आऊटस्टँडिंग | | नियमित/पात्र महिला एसएचजी | | व्याज द्रव्यसहाय्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम | खात्यांची संख्या | रक्कम | रक्कम |
| | | | | | | | | |

आम्ही येथे प्रमाणित करतो की, वरील कर्जे वेळेवर परत केली गेली आणि 3% व्याज द्रव्यसहाय्याचा लाभ महिला एसएचजींना देण्यात आला आहे व त्वरित प्रदान करणा-या महिला एसएचजींसाठी व्याजाचा परिणामकारक दर 4% एवढा कमी झाला आहे. ब्रँच स्तरावरुन पुढेही, नियमित दावा किंवा अतिरिक्त व्याज द्रव्यसहाय्य दावा सादर करण्यात, किमान मानवी हस्तक्षेप झाला आहे.

तारीख:

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

(ह्या वर्षासाठी एकत्रीकृत केलेला हा दाव्याचा नमुना, स्टॅट्युटरी ऑडिटर्सद्वारा प्रमाणित केला जाऊन तो, मार्च 31 रोजी संपलेल्या तिमाहीच्या दाव्यांसह, पुढील आर्थिक वर्षाच्या 30 जूनच्या आत सादर करणे आवश्यक आहे).

**जोडपत्र 5**

2016-17 सालासाठी, सभासद बँकांनी, डीएवाय-एनआरएलएमवर द्यावयाचे अंतिम प्रमाणपत्र (प्रत्यक्ष संख्या व रक्कम)

बँकेचे नाव :

मार्च 2017 साठी, ह्या दिवशी, कॅनरा बँकेच्या वेब पोर्टलवर अपलोड केलेला डीएवाय- एनआरएलएम दावा.

| **नियमित दावा** | | **अतिरिक्त दावा** | | **एकूण दावा** | |
|---|---|---|---|---|---|
| **खात्यांची संख्या** | **रक्कम** | **खात्यांची संख्या** | **रक्कम** | **खात्यांची संख्या** | **रक्कम** |
| | | | | | |

आम्ही प्रमाणित करतो की, दावा करण्यात आलेली खाती व रक्कम केवळ वर्ग 1 जिल्हयांमधीलच असून, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ही सर्व खाती व्याज-द्रव्यसहाय्यासाठी पात्र आहेत. आम्ही असेही प्रमाणित करतो की, ह्यात दाव्यांची द्विरुक्ती केली गेली नाही आणि नियमित दावा किंवा अतिरिक्त व्याज द्रव्यसहाय्य सादर करताना त्यात शाखा स्तराच्या पुढेही किमान मानवी हस्तक्षेप झालेला आहे.

तारीख : प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

**2016-17 सालासाठी, खाजगी बँकांनी, डीएवाय-एनआरएलएम खालील व्याज द्रव्यसहाय्य दाव्यांबाबत द्‍यावयाचे अंतिम प्रमाणपत्र**

बँकेचे नाव :

मार्च 2017 महिन्यापर्यंत, कॅनरा बँकेच्या वेबपोर्टलवर अपलोड केलेल्या दाव्यांचा तपशील.

तारीख

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता